सन २०१८-१९ करीता क्रीडा सुविधा निर्मितीसाठी
आर्थिक सहाय्य वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः क्रीडायो-२३१८/प्र.क्र.१५७/क्रीयुसे-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ०८ मार्च, २०१९.

वाचा:-

१) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र.राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२६०/क्रीयुसे १, दिनांक ०१ मार्च, २०१४.
२) सहाय्यक संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र.क्रीसुनि/आर्थिक सहाय्य/२०१८-१९/का.९/०२/१९५६, दिनांक ०१ जून, २०१८.
३) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र.क्रीसुनि/आर्थिक सहाय्य/२०१८-१९/का.९/२३७१, दिनांक २९ जून, २०१८.
४) सहाय्यक संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र.क्रीसुनि/आर्थिक सहाय्य/२०१८-१९/का.९/४६३२, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१८.
५) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र.क्रीसुनि/आर्थिक सहाय्य/२०१८-१९/का.९/३३६७, दिनांक २० फेब्रुवारी, २०१९.
६) सहाय्यक संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र.क्रीसुनि/आर्थिक सहाय्य/२०१८-१९/का.९/६४५५, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९.

प्रस्तावना:-

राज्यातील खाजगी/शासनाच्या मार्फत चालविण्यात येणाऱ्या व राज्य शासनाच्या संबंधित विभागांनी मान्यता दिलेल्या शैक्षणिक संस्था, विविध खेळांच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये पंजीबध्द असतील अशा व्यायाम संस्था, क्रीडा मंडळे, क्रीडा संघटना इत्यादींना क्रीडा सुविधा निर्मितीस व क्रीडा साहित्यासाठी ७५:२५ (शासन व संबंधित संस्था) या प्रमाणात अनुदान देण्यास संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. "क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य करणे" ही क्रीडा धोरणातील एक महत्वाची शिफारस आहे. राज्यातील शैक्षणिक संस्था, खाजगी क्लब, क्रीडा मंडळे, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था यामधून दर्जेदार क्रीडा सुविधा निर्माण करुन त्याव्दारे खेळाडूंच्या कामगिरीत वाढ करुन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण करण्यास चालना देणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.या संदर्भातील सविस्तर कार्यपध्दती दिनांक ०१ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली आहे. क्रीडा सुविधा निर्मितीसाठी सन २०१८-१९ करीता आर्थिक सहाय्य उपलब्ध करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उपरोक्त पार्श्वभूमीवर सन २०१८-१९ या वर्षाकरिता क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करण्याकरिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रु.१०००.०० लक्ष तरतूदीमधून ८०% च्या मर्यादेत रु.८००.०० लक्ष इतकी तरतूद सोबतच्या विवरणपत्र “अ”, “ब” व “क” मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे अनुदान वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

(१) शासन निर्णय दिनांक ०१ मार्च, २०१४ मधील बाब क्र. ४ (ब) क्रीडा साहित्यासाठी अनुदान मंजुरीच्या अटी व शर्ती नुसार संबंधित संस्थांना अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

(२) संबंधित संस्थेस सोबतच्या प्रपत्र “अ”, “ब” व “क” विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे अनुदान वितरित झाल्यानंतर प्रकल्प पूर्णत्वाचा दाखला प्रकल्पाच्या छायाचित्रासह व उपयोगिता प्रमाणपत्रासह लवकरात लवकर व कमाल १ वर्षाच्या कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक राहील, अन्यथा वितरित अनुदान शासनाच्या प्रचलित दंडनीय व्याज दराने अनुदान वितरित झाल्याच्या दिनांकापासून वसुल करण्यात येईल, ही अट मान्य असल्याचे हमीपत्र प्रतिज्ञापत्राद्वारे संबंधित संस्थेकडून घेण्यात यावे. तसचे प्रपत्र “क” मधील संबंधित संस्थेस एकूण मंजूर करण्यात येणाऱ्या अनुदानाच्या १०% रकमेची बँक गॅरेंटी घेणे आवश्यक राहील. त्यानुसार बँक गॅरेंटी व प्रतिज्ञापत्र संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे जमा करण्यात आल्यानंतर मंजूर रकमेच्या वितरणासाठी उपलब्ध होणारा निधी संबंधित संस्थेत आर.टी.एस.द्वारे वितरीत करण्यात यावा.

(३) प्रपत्र “ब” मध्ये मंजूर करण्यात आलेला निधी ७५ टक्के असून शासन अनुदानाशिवाय उर्वरीत २५ टक्के स्वहिस्सा संस्थेने खर्च करणे आवश्यक आहे. शासन अनुदान व स्वहिस्सा खर्च करुन विनियोग प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णय दिनांक ०१ मार्च, २०१४ मधील परिच्छेद क्र. ४ (ब) (१०) नुसार शासकिय संस्थांना स्वहिस्स्याची अट लागु राहणार नाही.

(४) प्रपत्र “क” मधील संबंधित संस्थेकडून स्व:हिस्सा २५% व देय अनुदानापैकी या शासन निर्णयान्वये वितरीत केलेले अनुदान प्रथम खर्च करून सदर बांधकामांच्या सद्यस्थितीतील फोटो सह सनदी लेखापालाच्या स्वाक्षरीचे खर्चाचे विवरणपत्र सादर केल्यानंतरच क्षेत्रीय कार्यालय /संचालनालयाकडून संबंधित संस्थेस उर्वरित देय रक्कम पुढ़ील आर्थिक वर्षात उपलब्ध तरतूदीच्या अधीन राहून वितरीत करण्यात यावी.

(५) संबंधित संस्थेने स्व:हिश्याची २५% रक्कम प्रथम खर्च करुन वरील अनुक्रमांक (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा क्रीडा अधिका-याकडे विवरणपत्र सादर केल्यानंतर संबंधित संस्थेची बँक गॅरेंटी मुक्त करण्यात यावी.

२. उपरोक्त अटींच्या अधिन राहून सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करण्याकरिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रु.१०००.०० लक्ष तरतूदीमधून सदर निधी वितरीत करण्यात यावा.

३. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च "मागणी क्र.ई-३ लेखाशिर्ष २२०४, क्रीडा व युवक सेवा, १०४ क्रीडा व खेळ, (४०) क्रीडा सुविधा, (४०) (०१) क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी सहाय्य (कार्यक्रम) (२२०४ ५७०६), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखालील या वर्षाच्या उपलब्ध तरतूदीमूधन करण्यात यावा.

४. वित्त विभाग दिनांक ०२.०४.२०१८ व २५.०१.२०१९ च्या परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. याकरीता संबधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकातील सूचनांना अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील मुद्दा क्र.१, २, ३, ४, ५, ६ व ७ मधील बाबी सदर आदेशास लागू नाहीत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१११८५०५२८७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: CN = Rajendra Shankarrao Pawar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = School Education and Sports Department
Date: 2019.03.11 18:54:42 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक, मुंबई.
२. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
५. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (क्रीडा संचालनालयामार्फत)

८. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
९. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर
१०.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई. (क्रीडा संचालनालयामार्फत)
११.सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत)
१२.वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१३.सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत)
१४.वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
१५.कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६.निवड नस्ती (क्रीयुसे-१)

सन २०१६-१७ मध्ये अनुदान वितरीत केलेल्या संस्थांना उर्वरित २५% निधी वितरण

प्रपत्र-"अ" **रु.लाखात**

अ.क्र.	संस्थेचे नांव	प्रकल्प	राज्यशासन अनुदान मर्यादा रु.	वितरीत निधी (७५%) रु.	वितरीत करावयाचा निधी (२५%) रु.
१	२	३	४	५	६
१	दिनदयाळ उपाध्याय सामाजिक विकास संस्था, लातूर, जि.लातूर	जलतरण तलाव	३७.५०	२९.२५	८.२५
२	व्यंकटेश सेवा समिती, वाशिम	बंदिस्त प्रेक्षागृह	९०.००	५८.५०	२५.००
एकुण					**३३.२५**

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: CN = Rajendra Shankarrao Pawar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = School Education and Sports Department
Date: 2019.03.11 18:55:00 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सन २०१८-१९ क्रीडा साहित्य खरेदी अनुदान वितरीत करण्यात येणाऱ्या संस्थांची यादी

प्रपत्र - "ब" **रु.लाखात**

अ. क्र.	जिल्हा / संस्थेचे नांव	तालुका निहाय संस्थांची संख्या	वितरित करावयाचा निधी रु.
१	२	३	४
१	नंदुरबार	२	६.००
२	धुळे	२	६.००
३	जळगांव	६	१८.००
४	नाशिक	४	१२.००
५	अहमदनगर	५	१५.००
६	बुलढाणा	४	१२.००
७	अकोला	४	१२.००
८	वाशिम	२	६.००
९	अमरावती	४	१२.००
१०	यवतमाळ	५	१५.००
११	वर्धा	२	६.००
१२	नागपूर	११	३३.००
१३	भंडारा	३	९.००
१४	गोंदिया	३	९.००
१५	गडचिरोली	३	९.००
१६	चंद्रपूर	४	१२.००
१७	नांदेड	१	३.००
१८	हिंगोली	१	३.००
१९	जालना	३	९.००
२०	औरंगाबाद (संभाजीनगर)	३	९.००
२१	बीड	५	१५.००
२२	लातूर	२	६.००
२३	ठाणे	९	२७.००
२४	रायगड	१	३.००
२५	मुंबई उपनगर	१२	३६.००
२६	मुंबई शहर	३	९.००
२७	पुणे	१२	३६.००
२८	सोलापूर	३	९.००
२९	कोल्हापूर	६	१८.००
३०	सांगली	६	१८.००

३१	रत्नागिरी	३	९.००
३२	सिंधुदुर्ग	४	१२.००
३३	पालघर	३	९.००
३४	सातारा	४	१२.००
३५	सहयाद्री ज्युडो संघ, पुणे	१	२.००
३६	ओम कबड्डी संघ, कल्याण	१	३.००
३७	विक्रोळी क्रीडा मंडळ	१	३.००
३८	नमस्कार मंडळ, कल्याण	१	३.००
३९	शासकीय वसतीगृह चर्चगेट व्यायामशाळा व क्रीडा मंडळ	१	४०.००
४०	प्रबोधन गोरेगांव	१	३.००
४१	कवी मोरोपंत माध्यमिक विद्यालय, श्रीरामनगर, बारामती	१	५.००
४२	पिपल्स एज्युकेशन सोसायटी, दादर	१	७.००
४३	चारकोप कलचरल अँड स्पोर्टस् फौंडेशन, कांदिवली, मुंबई.	६०	१८०.००
४४	प्रिमियर रिदमिक जिम्नॅस्टिक अॅकेडमी, शिवाजी पार्क, दादर, मुंबई यांचेकडील क्रीड मंडळ व सह.संस्था	८	२४.००
४५	भगिरथ ग्राम विकास प्रतिष्ठान, मु.पो.झाराप, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग यांच्याकडून आलेल्या विविध प्रकारच्या अर्जानुसार	८	१०.००
४६	विल्हेपार्ले कल्चरल सेंटर, मुंबई	१	१०.००
४७	टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ, डोंबिवली	१	३.००
४८	ठाणे जिल्हा पारंपारीक कुस्ती संघटना, ठाणे	१	३.००
४९	शिवनेरी क्रीडा मंडळ, कल्याण	१	३.००
	एकुण		**७३४.००**

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: CN = Rajendra Shankarrao Pawar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = School Education and Sports Department
Date: 2019.03.11 18:55:20 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सन २०१८-१९ मध्ये क्रीडा सुविधा निर्मितीसाठी अनुदान वितरीत करण्यात येणाऱ्या संस्थांची यादी प्रपत्र -"क"

रु.लाखात

अ.क्र.	संस्थेचे नांव	प्रकल्प	राज्य शासन अनुदान मर्यादा रु.	वितरीत करावयाचा निधी (पहिला हप्ता) रु.
१	२	३	४	५
१	मलकापूर शिक्षण समिती, मलकापूर, जि.बुलढाणा	बंदीस्त प्रेक्षागृह	९०.००	३२.७५

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: CN = Rajendra Shankarrao Pawar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = School Education and Sports Department
Date: 2019.03.11 18:55:36 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन